**प्रेस नोट** **दिनांक ०५/०३/२०१९**

**स्वारगेट पोलीस स्टेशन,पुणे शहर**

**स्वारगेट पोलीसांनी प्रवाशांचे व नागरिकांचे हरविलेले मोबाईल आय.एम. ई. आय.चे मदतीने शोध घेवून केले परत**

स्वारगेट पोलीस स्टेशन कार्यक्षेत्रात असणा-या एस.टी. स्टॅंड,पी.एम. टी. स्टॅंड तसेच इतर सरकारी कार्यालये असल्यामुळे या बागात प्रवाशांची तसेच नागरिकांची मोठ्या प्रमाणात ये जा असते त्यामुळे येथे मोबाईल चोरी व मोबाईल गहाळ होण्याचे प्रमाण जास्त आहे. परंतू असे असले तरीही स्वारगेट पोलीस स्टेशन येथे आलेल्या प्रत्येक नागरिकाची त्याबाबत तक्रार नोंदवून घेवून त्या तक्रारीचा पाठपुरावा केला जातो. याचेच उदाहरण म्हणजे आज रोजी स्वारगेट पोलीस स्टेशऩ कडून नागरिकांचे गहाळ झालेले २५ मोबाईलचा शोध घेवून सदर मोबाईल मुळ मालकास परत करण्यात आले. यासाठी श्री. बच्चन सिंग,मा. पोलीस उप आयुक्त परिमंडळ २ पुणे शहर,श्री. नांदेडकर,सहा. पोलीस आयुक्त स्वारगेट विभाग पुणे शहर, श्री. अशोक कदम वरिष्ठ पोलीस निरीक्षक स्वारगेट पोलीस स्टेशन व श्री. सय्यद पोलीस निरीक्षक (गुन्हे)स्वारगेट पोलीस स्टेशऩ पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली पो.शि. वाबळे स्वारगेट पोलीस स्टेशन पुणे यांनी या सर्व मोबाईलचा शोध घेवून ते आज रोजी नागरिकांना परत केले.नागरिकांनी त्याबाबत पोलीसांचे आभार मानले.

